ISSN-0971-2156 IMPACT FACTOR (2020) 5.24

SPECIAL ISSUE ON
INTERNATIONAL E-CONFERENCE
JANUARY-2021

# RESEARCH CARE ASSOCIATION

## *International E-Conference on Social Science, Science & Technology, Management and Humanities (ICSSMH) 2021*

Editors
Dr. A. Nageshwarrao
Mr.Shubham Ambhore

ISBN-0971-2156
Vol-12 Issue-03
Impact Factor(2020)- 5.24

# बौद्ध धम्मामध्ये दान पारमिता

प्रा. डॉ. मनोहर सिरसाट
संशोधन मार्गदर्शक
बलभीम महाविद्यालय बीड
पाडमुख भाग्यशाली रामदास
संशोधक विद्यार्थिनी
पाली आणि बुद्धिझम विभाग,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.

पारमिता या शब्दाला बुद्ध धम्मामध्ये अतिशय महत्त्वाचे स्थान आहे. बौद्ध धम्मामध्ये दानाला खूप महत्त्व आहे. दान पारमिता म्हणजे निस्वार्थ कृती होय. दान अशा व्यक्तींना दिले पाहिजे, की ज्या व्यक्तिला खूप गरज आहे. आपली नैसर्गिक प्रवृत्ती स्वत: घेण्याकडे व स्वत:साठी काही तरी ओढण्याकडे असते असे दिसते. आपल्या दैनंदिन वापरामध्ये कोणत्याही कामामध्ये आपण आपला स्वार्थ बघतो त्या कामामध्ये मला काय मिळणार हे आपले मत असते.

आपल्यापैकी ज्यांनी तिबेटी भवचक्र पाहिले असेल त्यांना आठवत असेल की त्या चक्राच्या मधोमध्य जे तीन प्राणी आहेत, त्यापैकी मधला एक कों ंबडा आहे. हा कोंबडा तृष्णा दर्शवितो. तृष्णा म्हणजे स्वभाविक इच्छा नव्हे, तर हाव होय. तृष्णेनेच आपण प्रोत्साहित होत असतो. एकंदर आपण ज्या ज्या गोष्टीमध्ये रस घेतो त्यामध्ये स्वार्थ असते.

निस्वार्थ वृत्ती आसायला पाहिजे. दान देताना सौजन्यातून द्यायला हवे. हसतमुखाने दान दिले पाहिजे. दान देताना आपण पश्चातापाने न देता तो दान आपण मनापासून व अंत:करणाने दिले पाहिजे. वॉल्ट व्हिटमन आपल्या कवितेतल्या एका ओळीत म्हणतो, "मी जेव्हा देतो, तेव्हा स्वत:लाच देत असतो." याचा अर्थ केवळ मी माझ्याच हाताने देतो. एवढाच नसून जेव्हा मी दान करतो तेव्हा सर्व अस्तित्वानीशी सर्वस्वाने करतो. कारण त्यापेक्षा काही कमी करणे शक्यच नसते.

धर्मग्रंथामध्ये दानाचा चार शीर्ष कारणानी विचार केला जातो.

1) दान कुणाला करायचे?
2) काय दान करायचे?
3) दान कसे करायचे?
4) हे दान का करायचे?

हे चार विभाग व त्याचे अविभाग या म्हणून 'दान' या विषयाची संपूर्ण व्याप्ती समजते. अशा दान भावनेचे बौद्ध वाङ्मयात पुष्कळ विवेचन केलेले आहे आणि त्याचे निरनिराळे प्रकारसुद्धा सांगितलेले आहेत.

1) भौतिक वस्तूचे दान : आपल्या जवळ असणाऱ्या अन्न,वस्त्र वगैरेसारख्या जीवनोपयोगी गोष्टीं ंचा इतरांना ही उपयोग करून देणे होय. प्राचीन काळात या दानाला फारच महत्त्व होते आणि आज त्याचे तेवढे महत्त्व मानले जात नसले, तरी दानाच्या या प्रकाराकडे भौतिक वस्तूचे दान अगदी नियमितपणे करीत असतात. भिकाऱ्याला अन्न तरी देतात किंवा पाच-दहा पैसे तरी देतात किंवा कोणाला कपभर चहा तरी पाजतातच. अशा रीतीने अगदी काही ना काही दान दिले जाते. आपल्या काही ना काही भौतिक प्राप्तीत दुसऱ्यासही सहभागी घालणे आवडते हे सुद्धा एक प्रकारचे दानाचेच आचरण होय.

2) शक्ती, वेळ आणि विचाराचे दान करण्याचा वेळही तर फारच मौलिक गोष्ट आहे. म्हणून आपण कोणाला मदत करण्यासाठी वेळ दुसऱ्यासाठी देवू शकतो. तर तो सुद्धा एक दानाचाच प्रकार होय.

3) ज्ञान दानाच्या म्हणजेच शिक्षण आणि संस्कृती मानले गेले आहे. बौद्धिक प्राप्ती ही केवळ स्वत: पुरतीच मर्यादित ठेवायची नसते, तर ती सर्वांना वाटायची असते, तिचा सर्वांना लाभ व्हावा म्हणून झटायचे असते. भारतात बौद्ध धम्म असताना या गोष्टीवर फारच भर दिलेला होता. मात्र हिंदू धर्मातील पद्धत सुरू केली आणि अर्थात ब्राह्मणां ंनी मात्र ज्ञानाच्या मक्तेदारीची पद्धत सुरू केली आणि बाकीच्या सर्व समाजास ज्ञान संपादनापासून वंचित ठेवले आणि त्यांना दास्यात जखडले. बौद्ध धम्माने मात्र धर्मनिरपेक्ष ज्ञान आणि संस्कृतीसह सर्व प्रकारचे ज्ञान ही कोणा एका जातीची किंवा वर्गाची मक्तेदारी नसून ते सर्व मानवजातीस खुले असावे यावरच कायम जोर दिलेला आहे.

4) बौद्ध ग्रं ंथात आणखी एक महत्त्वाचा दानाचा प्रकार सांगितलेला आहे आणि तो म्हणजे अभयदान होय. हा दानाचा प्रकार आपणास कादाचित विचित्र प्रकार वाटेल अभयदान हे काही आपणास कोणाच्या ताटात वाढता येण्यासारखी गोष्ट नाही, तर आपण आपला आत्मविश्वास इतराबरोबर वाढून घेण्याच्या रूपाने आपणास हे दान करता येते. आपल्या स्वत:च्या उपस्थितीने किंवा उदाहरणाने आपण इतरां ंच्या मनात निर्भयतेची आणि सुरक्षिततेची भावना निर्माण करू शकतो. केवळ आपल्या उपस्थितीने इतरांना दिलासा देण्याच्या या आचरणास बौद्ध धम्माने फार महत्त्व दिलेले आहे आणि समाज जीवनासाठी अशा प्रकारच्या दानाला बौद्ध धम्माच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचे योगदान मानलेले आहे.

शेवटी आपल्या जीवनाच्या दानापेक्षा श्रेष्ठ असे दान म्हणजे धम्मदान होय. म्हणजेच प्रत्यक्ष सत्याचे दान प्रत्यक्ष प्रज्ञेचे दान किंवा बुद्धात्वाकडे नेणाऱ्या मार्गाचे विमुक्तीकडे नेणाऱ्या मार्गाचे किंवा प्रत्यक्ष बुद्धत्वाचे किंवा निर्वानाचे दान होय आणि असे हे धम्मदान सर्व प्रकारच्या दानापेक्षा श्रेष्ठ प्रकोरेच दान ठरते.

ISBN-0971-2156
Vol-12 Issue-03
Impact Factor(2020)- 5.24

बुद्धाच्या शिकवणीनुसार आपण सदासर्वदा या नाही त्या पातळीवर काही ना काही दान करीत राहिले. पुर्वेकडील बौद्ध राष्ट्रात दानाचे हे आचरण सामाजिक आणि धार्मिक जीवनाच्या सर्व अंगात उतरलेले असते, झिरपलेले असते.

पाली वाङ्मयामध्ये पारमितांना बुद्धांचा कारक धर्म सुद्धा म्हणल्या गेले आहे. कारण पारमिता ही बुद्धाची पृष्ठभूमी आहे. बौद्ध साहित्यामध्ये दानाला फार महत्त्व आहे. त्यामुळेच बौद्ध काळात राजे-महाराजे बौद्ध धम्म आणि संघाला विविध प्रकारचे दान देत असत. तत्कालीन कालखंडात विविध राजांनी आणि राजकुमारींनी दिलेल्या दानाचा खालील प्रमाणे आपणास उल्लेख करता येतो.

**अनाथपिंडकाचे जेतवन दान :**

अनाथपिंडकाने बौद्ध धम्माची दीक्षा घेतल्यानंतर तो तथागत बुद्धाकडे गेला. तथागतांच्या जवळ जाऊन त्यांच्या उजव्या बाजूला आसनारथ झाला. आणि तथागताला म्हणाला, "तथागत आपणास माहीत आहे की धन धान्य समृद्ध आणि शांत पूर्ण अशा श्रावस्तीत मी वास्तव्य करीत आहे. श्रावस्तीत आज महाराज प्रसेनजीत अधिकार पदावर आहेत. अशा ठिकाणी एक विहार बांधावा अशी माझी इच्छा आहे. आपण कृपा करून श्रावस्तीत यावे आणि माझ्या विहाराचा स्विकार करावा." उत्तर भारतामध्ये स्थित श्रावस्ती येथील हे एक प्रमुख राज उदयास होते.

**सुजाताचे खीर दान :**

सुजाता ही उरुवेला येथे राहणाऱ्या सेनानी नावाच्या गृहस्थाची मुलगी सुजाताने एका वटवृक्षाला नवस केला होता की तिला मुलगा झाल्यास दरवर्षी ती नवस फेडेल कारण तिची इच्छा पूर्ण झाली होती. तिने पत्रा नावाच्या आपल्या दासीला नवस फेडण्याच्या पूजेचे स्थळ म्हणजेच पुजेची जागा स्वच्छ आणि निर्मळ करण्यासाठी तिथे पाठविले. त्याच वृक्षाखाली तथागत ध्यानधाराणा करीत बसलेले होते. दासी पुत्राने तात्काळ सुजातास बोलावून आणले. सुजातास असे वाटले की, साक्षात वृक्ष देवता स्पष्ट झाली आहे. सुजाताने सोन्याच्या पात्रात शिजवलेली खीर तथागतांना भोजनासाठी दिली. तथागत सुपतीठ नावाच्या नदीवर अंघोळीसाठी गेले आणि त्यानंतर त्यांनी अन्न ग्रहण केले. यावरून अन्नदानाचे महत्त्व आपल्या लक्षात येते.

**राजा बिंबीसाराचे वेळूवन दान :**

बिंबीसार राजा हा तथागतांचा फक्त सामान्य अनुयायी नव्हता, तर त्याचा परम भक्त आणि त्यांचा धम्माचा एक प्रमुख आधार होता. उपासक बिंबिसार राजा म्हणाला भिक्खू संघास मी या वेळूवन उद्यानाचे दान केले तर? आपण ज्याचे प्रमुख आहोत त्या भिक्खू संघात माझे वेळुवन दान देताना तो म्हणाला, "आपण त्याचे प्रमुख आहात त्या भिक्खू संघास माझे वेळुवन उद्यान मी दान देत आहे.

**चुदांचे भोजन दान :**

तथागत बुद्ध वैशाली येथे येऊन भंडग्रामास गेले. भंडग्राम येथून दृष्टीग्रामास व तेथून केश नगरास गेले. पापा येथे तथागत बुद्ध चंुद नामक लोहाराच्या आम्रवनात उतरले आहेत असे चुंदाने ऐकले. अशा कारणामुळे आनंदीत होऊन चुंद तथागतांना म्हणाला उद्या माझ्या घरी भिक्खू संघासह तथागतांनी येऊन भोजन घेण्याची कृपा करावी.

अशाप्रकारे दानाची भावना जीवनाच्या सर्व अंगात उतरलेली आपणास अनेक बौद्ध देशात पहावयास मिळते. अर्थात हा सर्व प्रकार कधी-कधी केवळ एक रूढी होऊन बसतो आणि त्यात फारशी दानाची भावना उरत नाही. यात काही शंका नाही. तरी सुद्धा अशा प्रकारच्या दानाचे आचरण केवळ आपल्याकडून अपेक्षित आहे. म्हणून हे जरी दीर्घकाळ करीत राहिले, तरी त्याचा आपल्या दान देण्याची आणि परिणाम होतोच. आपणास दान देण्याची आणि आपली प्राप्ती इतरामध्ये वाटून घेण्याची सवय लागते आणि सदासर्वदा आपलाच विचार करीत राहण्या ऐवजी इतरांचाही थोडा विचार करण्याची सवय होते.

**संदर्भ ग्रंथ :**

1. दस पारमिताएँ, मेवंकर भदन्त सांवगी, बुद्धभूमी प्रकाशन,नागपूर, पृ. 19,95
2. बौद्ध कथा - रघुनाथ सिंह, पृ. 56
3. भगवान बुद्ध आणि त्यांचा धम्म, अनु. धनश्याम तळवटकर व आचार्य म.भि. चिटणीस, पृ. 188-190
4. श्रमिकांचे जनक - तथागत बुद्ध, रूप कुलकर्णी, पृ. 115
5. पाली साहित्य में बोधित्सव सिद्धांत, मेधंकर भदन्त सांवगी, पृ. 68

# आंबेडकरी चळवळीचा महाकवी-वामनदादा

प्रा.डॉ. मनोहर सिरसाट
(मराठी विभाग प्रमुख)
बलभीम महाविद्यालय बीड

**प्रस्तावना**

वामनदादा कर्डक यांचा जन्म १५ ऑगस्ट १९२२ साली नाशिक जिल्ह्यातील ता. सिन्नर मधील देशवंडी या छोट्याशा खेड्यात झाला. वडिलांचे नाव तबाजी कर्डक, आईचे नाव सईबाई, मोठे भाऊ सदाशिव तर धाकटी बहीण सावित्री असा वामनदादांचा परिवार. घरी शेती होती, गुरं-ढोरं होती. वामनदादांचं बालपण गुरं-ढोरं राखण्यात गेलं. घरी अठरा एकर जमीन होती, धान्य घरात यायचं, तरी ही हंगाम संपला की आईनं डोंगरात जाऊन लाकडं गोळा करून मोळी बांधून ते जळतन सिन्नर बाजारात विकायचं. वडील हेडीचा धंदा करायचे. सा-यांनी कष्ट करायचे, तरीही आषाढ-श्रावणात आबाळ व्हायची. कधी तरवट्यांची भाजी, माठाची भाजी, कधी भाकरीच खावी लागायची. कधी गावात ढोर मेलं तर सागुती खायला मिळायची. अशा प्रतिकूल वातावरणात वामनदादांचं बालपण गेलं.

वयाच्या १९-२० व्या वर्षी वामनदादाचं लग्न झालं. अनसूया या मुलीशी झालं. कालांतराने त्यांच्या संसारात मुलीनं जन्म घेतला, तीचं नाव मीरा ठेवण्यात आलं. वामनदादाचं वैवाहिक जीवन सुखात गेलं नाही. बायको त्यांना सोडून गेली आणि पुढे आजारपणात मीराने पण जगाचा निरोप घेतला. वामनदादांना जीवनात हा फार मोठा धक्का होता. ते मीराचं दुःख कधीही विसरू शकले नाही. पुढे ते पोटाची खाळगी भरायला मुंबईच्या माया नगरीत आले. त्यांनी गिरणी, कोळशाच्या वखारीत कामही केले, तसेच चिक्की, आईस फ्रूट इत्यादी विक्रीचा धंदासुद्धा केला.

वामनदादांना लिहिता वाचता येत नव्हते, शिक्षण नसल्यामुळे आपण लिहू शकत नाही ह्याचे त्यांना खूप वाईट वाटत असे व डोळ्यातून आश्रू वाहू लागले. त्यांनी 'देहलवी' नावाच्या मास्तराकडून बाराखडी, मुळाखरे शिकली आणि जोडाक्षरे हे दुकानाच्या पाट्या वाचून शिकले. हळूहळू त्यांचं लेखन वाचणं वाढू लागलं.

नायगाव येथे १९४३ साली त्यांना बाबासाहेबांचे पहिले दर्शन झाले. त्यांना चित्रपट कथाकार, अभिनेता, व्हायची खूप आवड होती ते अनेक चित्रपट कंपन्यांमध्ये गेले. पणत्यांना निर्व्हा फिल्म कंपनीत एक्टर म्हणून प्रवेश मिळाला.

१९४३ काळात ते असेच राणीबागेत असता त्यांना हिंदी गीताचं विडंबन करायचं सूचलं. त्यांनी गीताचं विडंबन केलं व रात्री चाळीतील चाक-यांसमोर ते गाऊन दाखवलं. लोकांनी प्रशंसा केली, टाळ्या वाजविल्या आणि वामनदादा कर्डक कवी झाले.

वामनदादांनी पहिली गायन पार्टी शिवडी येथे स्थापन केली नंतर त्यांनी अनेक गायन पार्ट्या उभारल्या व ते स्वतः गीत रचना करू लागले. वामनदादा व त्यांचे कलावंत म्हणून कार्यक्रम सादर करू लागले.

याच काळात शांताबाई वामनदादांच्या जीवनात दुसरी पत्नी म्हणून आल्या. शांताबाई या आपल्या पत्नीला वामनदादा प्रेमाने 'दमाळी' म्हणायचे. दमाळीवर वामनदादाचे विशेष प्रेम होते. त्यांच्या पत्नीने त्यांना भटकंतीत साथ दिली. जवळपास ३०-३५ वर्षे वामन नावाच्या वादळी वा-यासोबत वावटळ म्हणून शांताबाई साथ देत राहिल्या. दरम्यान आजारामुळे पुढे त्यांना फिरणे अशक्य झाले. पुढे वामनदादा सतत फिरतीवर असत. त्यामुळे त्यांनी आपल्या पत्नीस नासिक येथे मेव्हण्याकडे ठेवले. पोटी संतान नसतानाही त्याची खंत न वाटू देता त्या दाम्पत्याने मेहुण्यांचा मुलगा दत्तक घेतला व आपला मानसपुत्र मानला.

वामनदादांना जीवनात स्वतःच घरकूल उभारता आलं नाही. त्यांनी 'माझ्या जीवनाचं गाणं' या आत्मचरित्रात म्हटलं आहे. वर्ग, शिष्य वर्ग, कलावंत वर्ग हेच दादांच्या जीव्हाळ्याचं घरे झाली. राज्यात, राज्याबाहेर कुठल्याही शिष्याच्या व चाहत्याच्या घरी ते बराच काळ स्वतःचं घर असल्यासारखे राहत असत. त्यांच्या शिष्यांनी, चाहत्यांनी व त्यांच्या परिवारातील सदस्यांनी एवढं सांभाळलं की दादांना आपल्या घरची आठवण शेवटपर्यंत होऊ दिली नाही. दादाही ह्या सर्वांना आपल्या मुला-मुलींसारखेच जपले.

त्यांनी अनेक लोकगीते लिहिली व सार्वजनिक ठिकाणी गाईली आणि लोककवी म्हणून महाराष्ट्रात प्रसिद्ध झाले. त्यांनी 'सांगते ऐका' या गाजलेल्या मराठी चित्रपटात 'आंबेडकर फेलोशिप' देऊन त्यांना गौरविण्यात आलेले आहे. रजतपत्र, ताम्रपट बाबासाहेबांच्या जन्मभूमीवर त्यांच्या नागरी सत्कार झाला. संत नामदेव, गवळी बंधू, उत्कृष्ट साहित्यिक पुरस्कार रूपये १०,०००, सन्मानपत्र कुसुमाग्रज यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. महाराष्ट्र शासनाने दलित मित्र हा पुरस्कार मुंबई. शाहीर अमरशेख हा प्रतिष्ठेचा पुरस्कार मुंबईत प्रदान. शाहीर फाटे या पुरस्काराचेही ते मानकरी ठरले.

अशा प्रकारे वामनदादा कर्डक महाकवी झाले व त्यांनी काही कविता वामन दादांनी आपल्या प्रदीर्घ लाभलेल्या आयुष्यात सुमारे पाच ते सहा हजार मराठी, हिंदी गीतांचे लेखन केलेले आहे. जवळ-जवळ पाच हजारापर्यंतची गीते केवळ बाबासाहेब आंबेडकरांच्या व्यक्तिमत्त्व, जीवन कार्य, तत्त्वज्ञान, चळवळ, यावरलिहिलेली आहेत. बाबासाहेबांच्या सर्व पैलूंचे दर्शन त्यांनी अशा हजारो गीतांमधून करून दिलेले आहेत. जीवनात कुठल्याही शाळेची रीतसर पायरी न ओलांडणारा इवलासा वामन देशी-परदेशी सर्वोच्च पदव्या संपादन करणारा महामानव भीम आपल्या लेखणी, वाणी, स्वरात कसा काय तोलू-पेलू शकला हे आश्चर्यकारकच आहे.

राजकारणातील दुही वामनदादांचे अंतःकरण दुखविणारी आहे. त्यामुळे त्यावरच्या राजकीय दुहीचे पडसाद खालच्या समाजात पडत होते. परिणामी गावागावात समाजात अंतर्कलहाने थैमान घातले होते. यावर वामनदादा कळवळून म्हणत असत व गात असत ते पुढील प्रमाणे,

"सांगु किती मी दादा
एकतेने येथे नांदा ।।धृ।।
आज तुमच्या घरची भाजी
मीठ त्यांचे मिरची माझी

एके ठिकाणी रांध एकतेने येथे नांदा''

हाच एकीकरणाचा संदेश समाजाच्या गळी उतरण्यासाठी वामनदादा आपल्या गायनाच्या व लेखनाच्या वेगवेगळ्या शैलिचा वापर करायचे. कधी-कधी ते आपल्या राकट व प्रखर भाषेतून समाजाच्या प्रबोधनाचे कार्य करीत असतं. भाऊक व चिंतनशील आणि गंभीरपणे एकीकरणाचा संदेश समाजाला समजाऊन सांगत असत.

भांडवली अर्थव्यवस्थेच्या कमालीच्या आर्थिक विषमतेने वामनदादा कासावीस होत असत. या देशाची सगळी संपत्ती केवळ टाटा, बिर्ला, बाटा सारख्या आठ दहा घराण्यांच्या हातात एकवटली आहे. देशाला स्वातंत्र्य मिळण्याच्या वेळी आर्थिक समाजवादाच्या आश्वासनाची इथल्या प्रस्थापित, मनुवादी राजसत्तेने वाट लावली. नेहरूंचा आर्थिक आश्वासनाची समाजवादाचा नारा पोकळ ठरला. यावर भांडवली व्यवस्थेला सवाल करणोर वामनदादा खळबळ माजवून देत असत. खेड्यातल्या प्रत्येक मुला-माणसांच्या तोंडी वामनदादांचे हे गाजलेले गीत अजूनही आहे.

'सांगा आम्हाला बिर्ला, बाटा, टाटा कुठाय हो
सांगा धनाचा साठा न् आमचा वाटा कुठाय हो।।धृ।।'

स्वातंत्र्याचा कायदा केवळ चिमूटभर लोकांनी मानसोक्तपणे घेतला. पददलित, गरीब, बहुजन, दलित आदिवासी, भटके विमुक्त यांना मात्र स्वातंर्त्याने काहीच दिले नाही. उलट त्यांच्यावर निर्दयी, आर्थिक, सामाजिक, धार्मिक, विषमता लादली. वामनदादा प्रत्येक आपल्या बाणेदार हिंदी गीतात डरकाळी फोडतात.

"देश की आजादी देश को फल न मिला
फल से आजादी का देश को बल न मिला
मलाई, बरफी का जब के बँटवारा हुआ
गरीब गाँव को हाथ का मैल न मिला
ट्रॅक्टर वामन का वहाँ तो चलने लगा
गरीब गाँव को छोटा हल न मिला''

अशा पद्धतीने समाजाच्या एकंदरच सामाजिक, आर्थिक दुःस्थितीची चिंता हा आंबेडकरी प्रतिभेचा महाकवी जीवनभर वाहत होता. समाज सर्वांगीण सुखी व्हावा, बौद्ध समाज समृद्ध व्हावा, इतर बहुजन समाज सक्षम व्हावा, याचे ते चिंतन व चिंता करत.

थोर कवी, निर्वाणस्य स्मृतीशेष वामनदादा कर्डक यांना आंबेडकरी कवी, गायक, शाहीर व गायन-वादन, कलावंताचे कुलगुरू म्हणायला हवे. या सगळ्यांच्या कुळाचा हा कवी कुलगुरूच होता.

**महाकवी वामनदादा कर्डक यांची प्रबोधनाची गाणी**

महाकवी वाम-नदादा कर्डकांच्या उपलब्ध पंधरा काव्यसंग्रह आणि गीत संग्रह आहेत. त्या सर्व पुस्तकांमधील एकुण कवितांची बेरीज केली असता ती जवळपास (१०७५) एवढी मोठी येते. परंतु वास्तवात ही संख्या (३०० ते ४००) च्या आत आहे. कारण अनेक कविता जवळपास सर्वच पुस्तकात बहुसंख्येने पुन्हा पुन्हा मुद्रीत झालेल्या आहेत. त्यातल्या काही पुस्तकात मुद्रणाच्या असंख्य चुका आहेत. असे झालेले असल्याने मुळ काव्य आणि गीतांचा पार आशयच बदलून गेलेला आहे. ही वामनदादांवर आणि त्यांच्या काव्य प्रतिभेवर अन्याय करणारी अतिशय गंभीर बाब आहे. वामनदादांच्या पुस्तकांना बाजारात खूप मागणी असते म्हणू-न केवळ व्यवसायाच्या निमित्ताने अनेकज्लोकज्घाईघाईने पुस्तके बाजारात आणित आहेत. वामनदादांची कवितांची पुस्तके बाजारात आणण्यापूर्वी शुद्धलेखनाच्या बाबतीत अतिशय दक्ष आणि जागरूकज्असावे. जेणे करून वामनदादांच्या कवितांचे शुद्ध रूप जपता येईल, नि महाकवी वामनदादांच्या मुळ प्रतिभेवर आपल्या हातून अन्याय होणार -नाही.

वामनदादांच्या खालील प्रकाशित काव्य संग्रह/गीत आहेत. त्यातील कवितांची आणि गीतांची संख्या पुढील प्रमाणे आहे.

आई या शब्दामध्ये किती ताकद असते हे दाखवू-न देण्याचे काम वाम-नदादा कर्डक यांनी आपल्या गीतातून केलेले आहे. आई म्हणजे जन्म देणारी, वात्सल्य,ज्करूणा, रस तिच्यात पाहायला मिळतो. त्या आईचे उपकार आपण कधीही विसरत नाहीत. परंतु आई बरोबरच वामनदादा कर्डक यांनी वेगवेगळ्याआईची जाणीव या ठिकाणी झालेली आहे. ते म्हणतात,

"आई भीमाई भीमाई
तीच दीनांची आई
नवा शिपाई आई भीमाई भीमाई"

या ठिकाणी एका आईने जन्म दिला तर दुसऱ्या आईने पारंपारिक गुलामगिरीतून मुक्त करू-न वेद-ना विद्रोह, -नकार, दुःख इ. वाचा फोडून माणूस म्हणू-न जगण्याचा अधिकार दिलेला आहे. कारण त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरां-ना खऱ्या अर्थाने आईची उपमा, दिलेली आहे. भीमाने सर्वसामान्य जनतेचे, विद्ययानपिढ्या गुलामीच्या बेड्या तोडल्या सर्व श्रद्धा अंधश्रद्धा, गोरगरीब जनतेचा कैवारी डॉ. बाबासाहेब आंबेडकर हेच आहेत. म्हणून ते सांगतात आई भीमाईचा जरी योद्धा असलो तरी मी नवा शिपाई आहे. गोरगरीब जनतेची ती उद्धारकर्ती आहे. तिने दलितांना, पददलितांना, गुलामांना, कामगारांना, शोषितांना, बेरोजगारांना, धर्मांधता धडा शिकवण्याचे, धार्मिक गुलामगिरीतून बाहेर काढण्याचे काम केलेले आहे, म्हणून प्रत्येक गीतातून त्यांनी भीमाईसाठी श्रद्धा स्थान ठेवलेली आपणास पाहवयास मिळते.

"तुच ती भीमाई माझी तीच ती रमाई
तुच इथे माझ्यासाठी झिजलीस आई
जीवन तुझे हे चंदन आहेत."

या गीतातून वामनदादा कर्डक यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरां-ना उपदेशातून म्हणतात की, तू माणसांसाठी केलेले कार्य अत्यंत मौलिक स्वरूपाचे आहे. हे सर्व कार्य चंदणासारखे आहे. ते सुगंधी आहे. चिरकाळ टिकणारे आहे. याचे अस्तित्व कायम स्वरूपात आहे. ज्यांना ज्यांना या सुगंधाने स्पर्शीलेले आहे ते सर्व या सुगंधातून ते सुगंधयुक्त होऊन जाणार आहे. तसेच कार्य डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आहे. त्यांनी केलेल्या कार्याची दखल आणि परंपरा पुढे हा समाज घेऊन चालतो आहे. या कार्यातून ज्या समाजाला स्पर्श झाला आहे. असे सर्व समूह या कामात मदतीला येवून आपले आत्मभान, अस्तित्व निर्माण करणार आहेत. म्हणून वरील ओळी मधून डॉ. बाबासाहेब आंबेडकरां-ना प्रेरणास्था-न मानले आहे. त्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकर जो आदेश देतील तो आदेश वामनदादांनासाठी महत्त्वाचा मानला जातो. यावर वामनदादा पुढे म्हणतात की,

"भीमा आमुचा धनी आम्ही त्याचे गडी इमानी
फार कष्ट केलं पीक जणू आलं. सोन्याचे
-नेम धरू-न मारू खडा भिरकावू-नी जोफणी"

म्हणू-न वाम-नदादा म्हणतात भीमा तू आमचा मालक आहेस. आम्ही तुमचे मावळे आहेत. तुम्ही केलेल्या कार्याचे किंवा आमच्यावर सोपवलेल्या

ISBN-0971-2156
Vol-12 Issue-03
Impact Factor(2020)- 5.24

कार्याची धूरा संभाळणे हे प्रथम कार्य आहे, ती इमानदारी आमच्यात आहे. तुम्ही हाती घेतलेल्या कार्याला सर्वाधिक यश प्राप्त होत आहे. परंतु तुम्ही चालवलेल्या कार्यामधे आम्ही अचूकपणे काम करत आहोत. वेगवेगळ्या काव्याच्या माध्यमातून नेम धरून समाजामध्ये अडकवलेल्या आणि पिढ्यानंपिढ्या बंधिस्त समाजाला जागृतीकरून वेदना, दुःखातून मूक्त करण्याचे कार्य हाती घेतलेले आहे. त्यामुळे अचूक पणाने नेम साधून आम्ही समाज जागृती करत आहोत. वामनदादा कर्डक यांनी हे एवढ्याच कार्यावर थांबले नाहीत तर ते पुढे म्हणतात की,

"म्हणतच गरगरणारं जातं जडलय भिमरायाची नातं
दळती दळण सगळे हातं ओवी नवी भीमाची गातं
करती ग्गोड गळ्याला साथं ।।धृ।।"

या काव्यगीतातून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्याची आणि कर्तृत्वाची चर्चा आता धरांघरां पर्यंत पोहचलेली आहे. घरातल्या सर्व महिला, नवतरूणी, सखी, मैत्रिण यांचे नाते डॉ. बाबासाहेब आंबेडकरांशी जूळलेले आहेत. त्याचे विचार त्यांना पटलेले आहे त्यांना खऱ्या अर्थाने माणूस पणाची जाणीव झालेली आहे. या जाणीवेतून बाबासाहेबांचे विचार घराघरातील जात्यावर सुद्धा गायले जात आहेत. हे नाते जाती पर्यंत मर्यादित राहिले नाही तर ते पिचलेल्या दबलेल्या शोषिलेल्या, धार्मिक गुलामीने बंदिस्त केलेल्या धर्मांधाना यातून मूक्त करण्यासाठीचा हा लढा अधिक संघटितपणे होतो आहे याची मांडणी वामनदादांनी केलेली आहे.

सारांश रूपाने असे म्हणता येते की, वामनदादा कर्डकांच्या गीताचे मूल्यमापन करत असताना सर्वप्रथम असे लक्षात येते की, वामनदादांच्या गीतरचनेची निर्मिती लोक गीतांच्या रचना तंत्रावर आहे. वामनदादांनी आंबेडकरी विचार प्रयोगरूपातून दलितांच्या घराघरांमध्ये पोहचविला. वामनदादांनी आपल्या गीतांची रचना करतांना अनेक अलंकाराचा आधार घेतलेला आहे. अलंकाराच्या व्याख्या मराठी व्याकरण समजणे इतपत वामनदादा काही भाषाभ्यासक नव्हते, प्राध्यापक किंवा व्याकरणार नव्हते. त्यांच्यावर प्राचीन काव्याच्या रूपबंधाचा प्रभाव गीतावर आहे. वामनदादांच्या गीतरचनेतून बोधपरता उद्बोधनाबरोबरच फुले, शाहू, आंबेडकरांची समग्र विचारधारा आपल्या रचनेतून ठेवलेली आहे. वामनदादांची गीतं म्हणजे क्रांतीची परिवर्तनाची वाट आहे. म्हणून ते दीन-दलितांना भारतीयांना नेहमी आपली वाटतात.

**संदर्भ ग्रंथ :**

१) बोराडे बाबा, आंबेडकरी लोक शाहिर : वामन कर्डक, प्रचार प्रकाशन, ज्कोल्हापूर, प्रथमावृत्ती ३ जुलै १९५६५ पृ. क्र. ५८.
२) वाघ गंगाधर आंबेडकरी विचार जनमनात रूजविणारा महाकवी, वामनदादा कर्डक, राहूल प्रकाश, द्वितीयवृत्ती २०११ पृ.क्र. १३१.
३) गायकवाड माधवराव, जाधव डॉ. सागर (संपा), महाकवी वामनदादा कर्डक समग्र वाङ्मय खंड ४ अवलोक संबोधी प्रकाशन, यवतमाळ, पृ. आ. १४ एप्रिल २०१६ पृ.क्र. १७१.
४) पवार दया. (सं.पा.) डॉ. बाबासाहेब आंबेडकर ज्गौरवग्रंथ, महांराष्ट्र शासन, साहित्य आणि सांस्कृतिक मंडळ, मुंबई, तृतीय आवृत्ती, २००६ पृ.क्र. २०३,२०४.
५) गायकवाड माधवराव, जाधव डॉ. सागर (संपा), महाकवी वामनदादा कर्डक, समग्र वाङ्मय खंड - ४ अवलोकन संबोधी प्रकाशन, यवतमाळ पृ.आ. १४. एप्रिल २०१६ पृ. क्र. ८४.
६) वाघ ग्गंगाधर, आंबेडकरी विचारधारा, जनमानात रूजविणारा, महाकवी, वामनदादा कर्डक, राहूल प्रकाशन, द्वितीयवृत्ती, २०११. पृ. क्र. १७६.
७) गायकवाड माधवराव, जाधव डॉ. सागर, (संपा) महाकवी वामनदादा कर्डक समग्र वाङ्मय खंड ४. अवलोकन संबोधी प्रकाशन, यवतमाळ प्र.आ. एप्रिल २०१६, प्र.क्र. ४७.